## नियमित दिवाणी दावा क्र.४६/२०२५ मधील निशाण क्र.५ खालील आदेश

[ CNR No.MHKO090001572025 ]

प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९, नियम १ व २ अन्वये प्रतिवादी क्र.२ तर्फे संबंधीत इसम यांनी दावा मिळकत १ब च्या आदेशाची अंमलबजावणी करतेवेळी ३ फुट रुंदीची पायवाट सोडून १० फुट रुंदीचा रस्ता करू नये, असा तुर्तातूर्त मनाई आदेश होणेकरिता वादी यांनी सादर केला आहे.

२. वादी यांचे थोडक्यात कथन असे आहे की, दावा मिळकत १अ ही वादींच्या मालकीची असून प्रतिवादी यांचा कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कसंबंध नाही. वादी हे दावा मिळकत १अ मध्ये सालोसाल ऊस, भात, सोयाबीन अशी पिके घेत असतात. दावा मिळकत १अ च्या म्हणजेच जमीन गट नं.५८१ च्या पुर्वेकडील बाजूस असलेल्या संकेश्वर खणदाळ रस्त्यास जाणे-येणेसाठी जमीन गट नं.५६५, ५८० व ५८१ या जमिनीच्या सरबांधावरून पुर्व-पश्चिम लांबीचा व दक्षिणोत्तर ३ फुट रुंदीचा सरबांध आहे. सरबांधावर पावसाळ्याच्या दिवसांमध्ये जनावरांना गवत व उर्वरीत कालावधीमध्ये सदर बांधाचा वापर शेतकरी पायी येणे-जाणेसाठी करतात.

३. वादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, अशी वस्तुस्थिती असताना देखील प्रतिवादी क्र.३ यांनी प्रतिवादी क्र.२ यांच्याकडे रस्त्याबाबत

प्रकरण दाखल केले. सदरील कामात दि.०६.०३.२०२३ रोजी निकाल लागून प्रतिवादी क्र.३ ते २० यांचा अर्ज मंजूर केला आहे. त्यावर नाराज होवून वादी यांनी उपविभागीय अधिकारी, गडहिंग्लज यांच्याकडे रिव्हीजन अर्ज दाखल केला. सदरील रिव्हीजन अर्ज दि.०१.०३.२०२४ रोजी अंशत: मंजूर करुन प्रतिवादी क्र.२ यांनी दावा मिळकत १ब बाबत पुन्हा फेरचौकशी करावी, याकरिता आदेश पारीत केला. तथापि, प्रतिवादी क्र.२ यांनी उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशात नमूद मुद्यांना बगल देवून प्रतिवादी क्र.३ ते २० यांच्याशी संगनमत करून दावा मिळकत १ब बाबत बेकायदेशीर व चुकीचा आदेश पारीत केला. सदरील आदेशाचा गैरफायदा घेवून प्रतिवादी क्र.२ हे ३ फुट रुंदीची पायवाट असताना १० फुट रुंदीचा रस्ता करत आहेत. सदरील कृत्य हे पुर्णपणे बेकायदेशीर असलेने प्रस्तुतचा अर्ज हा तुर्तातूर्त मनाई मिळणेकरिता सादर केला आहे.

४. प्रस्तुतच्या अर्जास प्रतिवादी क्र.२ यांनी नि.४८ प्रमाणे वादींच्या दाव्यास कैफियत व तुर्तातूर्त मनाई अर्जास म्हणणे दाखल केले. प्रतिवादी क्र.२ यांचे असे कथन आहे की, गट नं.५६५, ५६६, ५७९, ५८० व ५८१ मधील अस्तित्वात असलेला वहिवाटीचा अडवलेला रस्ता खुला करून मिळणेबाबत प्रतिवादी क्र.३ ते २४ यांनी तहसिल कार्यालयात दावा सादर केला होता. सदरील दाव्याचे गुणदोषावर काम चालून तत्कालीन तहसिलदार गडहिंग्लज यांनी अर्ज मंजूर करून दावा मिळकतीतील अस्तित्वात असलेला वहिवाटीचा अडवलेला रस्ता खुला करणेबाबत दि.०६.०३.२०२३ रोजी आदेश पारीत केला होता. सदरील आदेशावर वादी यांनी उपविभागीय अधिकारी यांचे न्यायालयात अपील दाखल केले. वादी

यांचा अर्ज अंशत: मंजूर केला व पुन्हा फेरनिर्णयाकरिता मामलतदार न्यायालयात वर्ग केला. त्यानंतर प्रतिवादी क्र.२ यांनी पुन्हा स्थळ निरीक्षण पंचनामा व वस्तुस्थितीबाबत स्थळ निरीक्षण टिपणी काढून वादी क्र.१ ते ३ यांनी पुर्वापार वहिवाटीच्या रस्त्यामध्ये पीक लागवण करुन अडथळा केल्याची बाब सिध्द झाल्याने पुर्वापार वहिवाटीच्या रस्त्यात केलेला अडथळा दूर करणेबाबत पुन्हा आदेश पारीत केले. सबब सदरील पारीत केलेला आदेश हा न्यायसंगत असलेने वादींना कसल्याही प्रकारची मनाई मागता येणार नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज खारीज करणेत यावा.

५. प्रस्तुत अर्जाकामी खालील मुद्दे माझे विचारार्थ निर्माण झाले असून, सदरचे मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणासह पुढीलप्रमाणे आहेत –

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | वादींच्या हक्कात प्रथमदर्शनी बाजू आहे काय ? | ... होय |
| २) | न्यायाचा तराजू वादींच्या बाजुने आहे काय ? | ... होय |
| ३) | तुर्तातूर्त मनाईचा अर्ज नामंजूर केलेस वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | ... होय |
| ४) | कोणता आदेश ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे |

# कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करिता** –

६. वादींनी प्रस्तुतच्या प्रकरणात मामलतदार न्यायालयाने मामलतदार न्यायालय अधिनियमाचे कलम ५(२) अन्वये दिलेला आदेश आव्हानित केला आहे. वादींचे मुख्यत: असे कथन आहे की, मामलतदार न्यायालयाने पारीत केलेला आदेश हा न्यायसंगत नसून उपविभागीय अधिकारी यांनी केलेल्या निर्देशाचे पालन न करता पारीत केला आहे. सबब सदरील आदेशान्वये रस्ता खुला करून देण्याची कार्यवाही ही बेकायदेशीर आहे. त्यामुळे सर्वप्रथम वादींमार्फत मामलतदार न्यायालयाने पारीत केलेला आदेश हा प्रथमदर्शी न्यायसंगत आहे अथवा नाही, हे बघणे क्रमप्राप्त ठरते. मान्यत: मनाईचा हुकूम आदेश निकाली काढताना केवळ प्रथमदर्शी बाजुची पडताळणी करणे गरजेचे असते. त्यामुळे प्रथमदर्शी प्रस्तुतचा आदेश विचारार्थ घेण्यात येतो.

७. प्रतिवादी यांनी गट नं.५६५, ५६६, ५७९, ५८० व ५८१ मध्ये अस्तित्वात असलेला वहिवाटीचा अडवलेला रस्ता खुला करून मिळावा, याबाबत मामलतदार न्यायालयात कलम ५(२) अंतर्गत अर्ज सादर केला. सदरील अर्ज प्रतिवादी यांच्या हक्कात मंजूर करण्यात आला. सदरील आदेशावर वादी यांनी फेर विचार याचिका उपविभागीय अधिकारी, गडहिंग्लज यांच्या न्यायालयात सादर केली. सदरील फेरविचार याचिका गुणदोषांवर निकालात काढून मामलतदार न्यायालय यांचा आदेश रद्द करून फेरविचार करण्याकरिता मामलतदार न्यायालयास आदेशित

केले. सदरील फेरचौकशी करताना मुळात रस्ता अस्तित्वात आहे काय ?, अस्तित्वात असलेला रस्ता करण्यात आला आहे अगर कसे ?, प्रकरणी आवश्यक सर्व खातेदारांना रितसर नोटीस काढण्याबाबत तसेच रस्त्यात कोणत्या पध्दतीने अडथळा निर्माण केला आहे, याबाबतचे विवेचन तसेच पंचनामा देखील चुकीच्या पध्दतीने केल्याबाबतची टिपणी सदरील आदेशात करण्यात आली आहे. सबब मामलतदार न्यायालय, गडहिंग्लज यांनी वरील मुद्यांबाबत फेरचौकशी केली अथवा नाही, हे बघणे प्रथमदर्शी क्रमप्राप्त आहे.

८. मामलतदार न्यायालय यांनी दि.२१.०२.२०२५ रोजी पारीत केलेल्या आदेशाची प्रत प्रकरणात सादर केलेली आहे. सदरील आदेशाचे अवलोकन केले असता त्यामध्ये मामलतदार न्यायालय यांनी खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविल्याचे दिसते :-

> *" प्रस्तुत प्रकरणी फेरचौकशीमध्ये प्रतिवादी यांनी उपस्थित केलेले मुद्यांचे अनुषंगाने दावा मिळकतीचा दिनांक २५/०९/२०२४ इ. रोजी वादी व प्रतिवादी यांचे उपस्थितीत वस्तुस्थितीदर्शक स्थळ निरीक्षण टिपण्णी काढणेत आलेली आहे. वादी यांनी मागणी केलेला रस्ता हा फक्त घराकडे जाणे-येणे कामी मागणी केला नसून त्यांना त्यांचे शेत जमिनीमध्ये जाणे-येणे कामी तसेच शेत माल, शेती औजारे, बी-बियाणे, खतकाडी, जनावरे इत्यादी वाहतूक करणेकामी रस्त्याची मागणी केलेली आहे. तसेच गट नंबर ५६५, ५८०, ५८१ बाबत दिनांक ३०/०६/२०२३ रोजी झालेली मोजणी ही शासकीय*

*मोजणी असून मोजणी नकाशामध्ये दर्शविलेल्या नोंदी या पुरावा म्हणून ग्राह्य धरणे आवश्यक आहे. वरील विवेचनावरून प्रतिवादी फेरचौकशीमध्ये उपस्थित केलेले सर्व वादाचे मुद्दे निकाली निघाले आहेत."*

९. मामलतदार न्यायालयाने दिलेले निष्कर्ष बघता सदरील निष्कर्षामध्ये मुळचा रस्ता अस्तित्वात होता का, याबाबत कसल्याही प्रकारची टिपणी केल्याचे दिसून येत नाही. तसेच प्रतिवादी यांनी केलेली मागणी फक्त घराकडे जाणे-येणेकामी नसून शेतजमिनीमध्ये जाणे-येणेकामी तसेच शेतमाल, शेती अवजारे, बी-बियाणे, खतकाडी, जनावरे इ. वाहतूक करणेकामी केलेली आहे, असे मत प्रदर्शीत केले आहे. मुळात प्रतिवादींमार्फत काय मागणी करण्यात आली, हे अर्ज निकाली काढणेस महत्वपुर्ण नाही. तर मुळात घटनास्थळी किती फुटाचा रस्ता पुर्वापार अस्तित्वात होता व त्यावर कशाप्रकारे व किती प्रमाणात अतिक्रमण करण्यात आले, याबाबत कारणमिमांसा येणे गरजेचे होते. प्रतिवादीस दुसरा वहिवाटीचा रस्ता उपलब्ध नाही, असे मत देखील मामलतदार न्यायालयाने प्रदर्शीत केले.

१०. मामलतदार न्यायालय अधिनियम कलम ५ अंतर्गत कारवाई करताना पर्यायी रस्ता उपलब्ध आहे अथवा नाही, हा मुद्दा विचारार्थ येत नाही तर अस्तित्वात असलेला रस्ता यावर अडथळा निर्माण करण्यात आला आहे का, ही बाब बघणे क्रमप्राप्त राहते. सबब मामलतदार न्यायालय यांनी दिलेला आदेशाचा संपुर्ण विचार केला असता उपविभागीय अधिकारी यांनी प्रस्थापित करुन दिलेले मुद्दे

प्रथमदर्शनी त्यांनी पुर्णपणे विचारार्थ अथवा कारणमिमांसा करिता घेतले नाहीत, असे दिसून येते. त्यामुळे प्रथमदर्शी वादी यांनी केलेले कथन संयुक्तिक असल्याचे दिसते.

११. प्रतिवादींमार्फत त्यांच्या कथनापुष्ट्यर्थ [१] *विष्णू सुखदेव घानवट विरुध्द जिल्हाधिकारी अहमदनगर -- (२०१७) १ एम.एच.एल.जे. ८११* ; [२] *भास्कर शंकर गायकवाड विरुध्द शिवाजी आनंदराव जाधव व इतर -- बॉम्बे हायकोर्ट सिव्हील रिट पिटीशन नं.२३५८/२०१६, निकाल ता.०९.०१.२०२०* ; [३] *रमेश दामु पाटील विरुध्द पुरूषोत्तम उमराव चव्हाण -- (२०१७)१ एम.एच.एल.जे. ८१८* या न्यायनिवाड्यांचा आधार घेण्यात आला. ***विष्णू (वर नमूद)*** या प्रकरणात असे प्रतिपादन केले आहे की, शेतबांध हा पायवाट म्हणून उपयोगात आणण्याकरिता असतो त्यास कोणीही अडथळा केल्यास महसूल खात्याने सदरील अडथळा काढून घ्यावा. माझेसमोरील प्रकरणात वादींनी बांधावरून जाण्यास प्रतिवादींना कसल्याही प्रकारची मनाई केली नाही तर करण्यात येणारा रस्ता हा ३ फुट ऐवजी १० फुट करण्यात येत आहे, याबाबत वादी यांनी मनाई मागितली आहे. सदर न्यायनिवाडा देखील केवळ पायवाट संदर्भात असलेने तो या प्रकरणास लागू होणार नाही. ***भास्कर (वर नमूद)*** या न्यायनिवाड्याचे अवलोकन केले असता प्रस्तुतचा निवाडा हा केवळ त्या प्रकरणातील तथ्यास अनुसरून असलेने या अर्जाकामी लागू होणार नाही. ***रमेश पाटील (वर नमूद)*** या न्यायनिवाड्यात फेरविचार याचिका चालविण्याचा अधिकार हा केवळ सहा. जिल्हाधिकारी यांना असून उपविभागीय अधिकारी यांना नाही, असे मत प्रदर्शीत केले आहे. माझेसमोरील प्रकरणात उपविभागीय अधिकारी यांचा आदेश कायद्यास

अनुसरून नाही, याबाबत प्रतिवादी यांनी कुठेही आव्हानित केलेले नाही. त्यामुळे सदरचा न्यायनिवाडा देखील प्रतिवादींना सहाय्यक नाही.

१२. सबब वरील संपुर्ण विचारांती मी या मतास आलो आहे की, प्रथमदर्शी मामलतदार न्यायालयाचा आदेश हा उपविभागीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे नसल्याचे दिसून येते. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ यास होकारार्थी उत्तर देत आहे.

**मुद्दा क्र.२ व ३ करिता** –

१३. दोन्ही मुद्दे परस्परांशी संलग्न असलेने विचारार्थ एकत्रीतरित्या घेण्यात येत आहेत. प्रकरणात सादर केलेले छायाचित्र बघितले असता प्रतिवादी यांच्या शेताकडे जाणेकरिता ३ ते ४ फुटाचा रस्ता अस्तित्वात असल्याचे दिसते. त्यामुळे प्रतिवादीच्या शेतात जाणेस कुठलाही रस्ता उपलब्धच नाही, असे म्हणता येणार नाही. वादींनी देखील उपलब्ध असलेल्या ३ ते ४ फुटाच्या रस्त्याच्या वापरास त्यांची कोणतीही हरकत नाही, असे प्रतिपादन केले आहे. प्रतिवादींतर्फे वादींनी वादातीत रस्ता अडविल्याबाबतची प्रथमत: तक्रार ही सन २०२१ साली केल्याचे दिसते. म्हणजेच मागील ५ वर्षांपासून आहे त्या पायवाटेवरून प्रतिवादी आपली वहिवाट करत आहेत. त्यामुळे दाव्याचा निकाल लागेपर्यंत आहे ती परिस्थिती कायम ठेवल्यास प्रतिवादींचे नुकसान होणार नाही. उलटपक्षी वादी यांनी मामलतदार न्यायालयाचा आदेश आव्हानित केला आहे. जर वादींना मनाई देण्यात आली नाही व मामलतदार न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी झालेस प्रस्तुतच्या दाव्यास

कुठलाही अर्थ उरत नाही. सबब न्यायाचा समतोल व न भरून निघणारे नुकसान हे वादींच्या हक्कात असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे मी मुद्दा क्र.२ व ३ चे उत्तर होकारार्थी देवून मुद्दा क्र.४ चे उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे :-

## आदेश

१] अर्ज मंजूर करण्यात येतो.

२] प्रतिवादी क्र.२ यांनी अगर त्यांचेतर्फे इसम यांनी, या दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो, दावा मिळकत १ब च्या आदेशाची अंमलबजावणी करतेवेळी ३ फुट रुंदीची पायवाट सोडून १० फुट रुंदीचा रस्ता करु नये, अशी तुर्तातूर्त मनाई देणेत येत आहे.

३] खर्चाबाबत आदेश नाही.

Digitally signed by NARENDRA
Date: 2025.04.21 17:33:31 +0530

स्थळ : गडहिंग्लज.
दिनांक : १९.०४.२०२५.

( न. श्री. पुरी )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
गडहिंग्लज